
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 8 | MAY - 2018

# गांधी प्राणितखादीचे भारतातील रोजगार निर्मितीतील योगदान



[1]प्रा. तळणीकर एस.जी. [2]डॉ. शरद कुलकर्णी
[1]सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग
तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगाव जि. हिंगोली
[2]प्राचार्य, नूतन महाविद्यालय, सेलू

## प्रस्तावना

स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदुस्तानात गरिबी आणि अवर्षनामुळे निर्माण होणारी बिकट समस्या म्हणजे उपासमार आणि भूकबळी, या सर्वांवर जर पर्याय शोधाय चाअसेल तर , चरखाच एकमेव उपाय आहे असे महात्मा गांधीजींचे स्पष्ट मत होते . त्यांच्यामते जर आपण पारंपारिक पद्धतीने या समस्यांचे निराकरण करण्याचा विचार केला तर त्यात आपल्या पिढ्यानपिढ्या निघून जातील परंतु उपासमार आणि गरिबी निर्मुलनहोणार नाही . त्यामागीलएकमेव कारण म्हणजे ग्रामीण भागातील लोकांचा निरुद्योगीपणा व त्यांच्या भागात निरंतरनिर्माण होणारी दुष्काळी परिस्थिती हे आहे म्हणून गांधीजींच्या म तानुसार जर ग्रामीण भागातील लोकांनी चरख्याचे अवलंबन करून त्यातून काही उद्योग निर्मित केले तरत्यांची हलाखीची आर्थिक परिस्थिती नक्कीच लवकरात लवकर सुधारल्या जाऊ शकते . दुसरे म्हणजे हिंदुस्तानची भौगोलिक क्षमता, जसे उत्तम हवामान, उत्तुंग पर्वत रांगा, प्रंचड बारमाही वाहणाऱ्या नद्या , सुपीक जमीन , अथांग समुद्र किनारा आणि नैसर्गिक साधन संपत्ती , यांचा जर परिपूर्ण उपयोग ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीने घेतला तर प्रत्येक व्यक्तीच्या हाताला काम आणि परिवाराला मुबलक अन्न मिळू शकेल आणि पर्यायाने निर्माण झालेला हा यक्ष प्रश्न सु द्धा सुटेल, असे असले तरी त्या काळी ग्रामीण भागातील जनतेमध्ये शरीर श्रम व बुद्धिमत्ता या दोघांमध्ये फारकत असल्याचे महात्मा गांधीजींनी नमूद केले त्याचे कारणही त्या प्रमाणेच होते , जगात सर्वात कमी आयुर्मान असणाऱ्या आपल्या या देशाची उत्पादन क्षमता सु द्धा कमीच होती . महात्मागांधींजींनी०६ फेब्रुवारी १९३८ मध्ये हिरापूर येथे भरलेल्या अधिवेशनात उद्घाटन पर भाषणात असाउलेख केला होता कि, “ग्रामोद्योगांच्या योजनेत चरखा मध्यबिंदू आहे,त्यायोजनेला तुम्ही जर सुर्यमालेची उपमा दिली, तर चरख्याचे चक्र हे सूर्याचे सोनेरी मंड ल आणि अन्य ग्रामोद्योग हे त्या योजनेच्या अनुलघ्य नियमानुसार त्याचे भोवती फिरणारे ग्रह ठरतील ”. हिंदुस्तानातील खेडी जर आपणास प्रगत करायची असतील तर आपणास अवगत असलेल्या सर्व हस्तकला व्यवसाय यांच्या केंद्रस्थानी चरखा बसविला पाहिजे , कारण चरख्याचा सूर्य हाच इतर सर्व हस्तव्यवसायाचे ग्रह प्रकाशित करू शकतो. ज्याप्रमाणे दिवसागणिक नव नवीन ग्रह आणि तारे शोधून काढले जात आहेत त्या प्रमाणे नवनवीन हस्तव्यवसाय शोधून काढले पाहिजेत. चरख्याचे ज्ञान जर आपणास असेल तर तो आपणास केवळ आर्थिक उन्नती न देता, आपल्या मनात आणि अंतर्मनामधेहीक्रांती घडवून आणू शकतो. आपली ग्रामीण विकासाची प्रगती मंद जरी असली तरी तीच आपणास सर्वात सोयीचीआणि सुखकर आहे असे गांधींजीं नेहमी म्हणत . स्वराज्यउभारणी साठी खेड्यांचे महत्व गांधीजींना माहित होते त्यामुळे ते ग्रामीण भागात हात मागावर विणलेली खादी आणि अहिंसा यांचे समीकरण जोडत असत. जर चरखा (खादी) जिवंत राहिला तर आणि तरच अहिंसेच्या मार्गाने स्वराज्य स्थापन करता येवू शकेल याची त्यांना जणूकाही जाणीवच झाली होती . तत्कालीन समयी निर्माण झालेल्या आर्थिक दैन्याचा प्रश्न अत्यंत साध्या, स्वस्त आणिव्यापारी पद्धतीने सहजासहजी सोडविण्याचे श्रेय चरख्याला देता येईल. ग्रामीण भागातील सर्व जनतेने आपल्याला आवश्यक त्या सर्व वस्तू जर गावातच निर्माण केल्या आणित्याजास्तीच्या निर्माण केलेल्या वस्तू शहरी भागात विक्रीस पाठवल्या तर त्यातुन खेडी समृद्ध होण्यास मदत होईल , कारण खेड्यातील लोकांकडे काम घेऊन जाण्याचा मार्ग यंत्रे सुरु करणे हा नसून आजपर्यंत ते जे उद्योग करीत आले आहेत त्याला प्रोस्ताहनदेऊन पुन्हा प्रस्थापित करणे हा आहे. खेडी समृद्ध होण्यासाठी खादि बरोबरच खेड्यात उत्पादित होणाऱ्या इतर जीवनावश्यकवस्तू जसे कि , बैल घाण्याचेतेल, पेंड , साळीचा तांदूळ, ताड गुळ, मध, खेळणी, चटई, हात कागद, साबण वगेरे, याची जोड मिळणे आवश्यक आहे . तरी सुद्धा या ग्रामोद्योगांचे अधिष्ठान खादी पेक्षा फार वेगळे आहे कारण त्यात ऐच्छिक मजुराला फा रसा वाव नाही , प्रत्येकउद्योगात काहीच माणसे मजूर म्हणून कार्य करू शकतात . त्यामुळे गांधींजीं नेहमी म्हणत इतर ग्रामोद्योग हे

खादीउद्योगाला उपयोगी पडणारे उद्योग आहेत आणिखादी शिवाय ते टिकू शकणार नाहीत . तसेच गांधींजीं नेहमी नमूद करायचे कि, “खादी आणिखादीवर अवलंबित उद्योगावाचूनग्रामीण अर्थ-व्यवस्था पूर्ण होणे शक्य नाही”

## खादी आणि रोजगार निर्मिती

भारत देश हा कृषिप्रधान देश आहे, लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे म्हणूनच दरडोई ज मीनीचे प्रमाण कमी होत आहे तसेच उत्पन्नही घटत आहे. ओलिताची सोय झाली तर उत्पादन वाढू शकते हे जरी खरे असले तरी यामुळे ग्रामीण भागातील लोकांना वर्षभर रोजगार मिळेल याची कोणतीही शाश्वती नाही म्हणून पूरक उद्योग खूप आवश्यक आहेत, ग्रामीण भागातील लोक कामासाठी शहराकडे जातात व खेडे ओस पडतात , जर हे स्थलांतर थांबवयाचे असेल तर त्यांना तिथेच काम द्यावे लागेल, काम कोणते द्यावे याचा जर विचार केला तर असे काम आपल्याला त्यांना द्यावे लागेल ज्याच्यासाठी आवश्यक कच्चा माल हा तेथेच उपलब्ध आहे व त्याचा पक्का माल तेथे तयार करता येईल व या च्यासाठीखादी शिवाय ईतर कोणताही पर्याय असूच शकत नाही असे गांधीजींचे स्पष्ट मत होते. खादी चा प्रचार व प्रसार करणे आवश्यक आहे यावर ते ठाम होते कारण गावात कापूस पिकतो, चरख्याच्या वापराणे तेथे खादीची निर्मिती होऊ शकते , पर्यायाने गावातील लोका नां काम मिळेल व गावे वस्त्राच्या बाबतीत स्वयंपूर्ण होतील. जास्त उत्पादनझालेले, गावातील लोकांनी शहरात विकावे व शहरातील लोकांनी ते घ्यावे यातूनच गावाकडून शहराकडे होणारे स्थलांतर थांबेल अन्यथा असंख्य गावकरी शहराकडे जातील तेव्हा त्यांची दुर्द शा तर होईलच परंतु शहरात राहणाऱ्यांची सुद्धा अवस्था अतिशय कठीण होई ल. या देशातील बेकारी जर हटवायची असेल तर खादी हाच त्याकरिता सर्वमान्य व प्रभावी उपाय असू शकतो यावर कोणाचेही दुमत असण्याचे काहीच कारण नाही कारण यांत्रिकीकरणाच्या या काळात जेव्हा व्यक्ती मोठ्या प्रमाणावर बेरोजगार होत आहेतअशा परिस्थितीत त्यांच्या हाताला काम देण्याचे सामर्थ्यफक्त खादीतच आहे असागांधीजींचा विश्वास होता.

अशा विचाराच्या मागे ही महात्मा गांधी यांची सूक्ष्म दृष्टी आढळून येते. ज्या देशात केवळ शेती होते ते देश हे तुलनेने दुर्बल समजले जातात, भारतात तर ७५ टक्के पेक्षा जास्त लोक हे शेतीवरच अवलंबून आहे त, त्यामुळेच जर आपल्या देशातील शेतकऱ्यांच्या हाताला आणखी काही काम अथवा उद्योग राहीले तरच त्यांचा निभाव शक्य आ हे. भारताची मुख्य शक्ती आहे काम करणारे हा त, शक्ती जर बेकार पडून राहली आणि आपण फक्त यंत्र, यंत्र असा घोष करत राहलो तर त्याने काम होणार नाही उलट काम करणारे हात हे खाली राहतील व ही शक्ती विस्फोटक स्थितीत येऊन चुकीचे वर्तन करायला लागेल वदेशाची वाटचाल ही एक शांत व अहिंसक समाजा पासून दूर अशाविस्फोटक समाजा कडे रुपांतरीत होईल जे गांधीजींना मान्य नव्हते. या उलट जर आपण चरखा हाती घेतला आणि कपडा बनविणे सुरु केले तर त्या हाताना क्रयशक्ती प्राप्त होईल. भारतातील शेतकरी आणि खादी सोबत त्यांच्या नात्याला अधोरेखित करताना गांधींजीं नेहमी असे मत मांडत की , या देशातील बेरोजगारी पेक्षा अर्ध रोजगाराची समस्या मोठी आ हे, शेतकऱ्यांच्या हातात असे काम पाहिजे , की ते रिकाम्या वेळात करू शकतील तसेच जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा बंद देखील करता येईल , असा उद्योग जो त्या ना त्यांच्या घरातच करता येईल व त्यासाठी लागणारा कच्चा माल देखील त्यांच्या कडे उपलब्ध असेल .त्याशिवायआपल्या ग्रामीण भागाचा विकास शक्य नाही पर्यायाने या देशाचा विकास शक्य नाही व या साठी उद्योग म्हणून ते नेहमी खादी व ग्रामोद्योगाकडे पाहत असत.

## निष्कर्ष

महात्मा गांधींनी खादी ला महत्व दिले कारण ते खादीला स्वातंत्र्याचागणवे षमानत, तसेच त्यांनाफक्त स्वातंत्र्य अभिप्रेत नव्हते तर स्वराज्य पाहिजे होते त्यांच्यामते स्वराज्य म्हणजे देशात संपूर्ण मुक्ती , पूर्णतः आर्थिक वसामाजिकस्वातंत्र्यहोय. महात्मा गांधींनी १९२० च्या नागपूर अधिवेशनात, इंडियन नॅशनल काँग्रेसने राष्ट्रवादी कापड खादीं ला प्रोत्साहित करण्याचे आपले उद्दिष्ट प्रथम सांगितले असल्याचे तसेच खादीला "स्वातंत्र्याचे अस्त्र" म्हणून संदर्भित केल्याचे दिसून येते. मनुष्य स्वतःच्या भविष्याचा शिल्पकार बनला पाहिजे, दडपून टाकणाऱ्या सर्व क्षेत्रातील संस्था आणि रचना नष्ट व्हा व्या हा त्यांचा ध्यास होता .त्यासाठी मनुष्याने सरकार व बाजाराच्या शक्ती पासून स्वतःला मुक्त करून घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि अशा स्वावलंबी मनुष्यांनी एकमेकासोबत जगात परस्पर -सहकार्याने सामुदायिक जीवनाची घडण करावी असा गांधीजींचा नेहमीच प्रयत्न होता. त्याकरिता त्यांनी आयुष्यभर खादी चा प्रचारकेला कारण या देशाला स्वयंपूर्ण बनविण्याची ताकदफक्त खादीमध्येच आहे हे त्यांचे ठाम मत होते.

## संदर्भ


1. M. A. Muttalib - 'Volunteerism and Development: Theoretical Perspectives', the Indian Journal of Public Administration, Vol. XXXIII, No.3, July-Sept. J1987, P. 402.
2. NoorjahanBawa- 'Non-Governmental Organisations in Development': Theory and Practice, First Published, 1997, Kanishka Publishers, New Delhi, P.16.
3. United Nations ESCAP- 'Fiscal Incentives and other Measures to support the Growth and Viability of NGOs for HRD' 1994, P.1.
4. B.T. Lawani - 'NGOs in Development' 1999, Rawat Publications, Jaipur and New Delhi, P.23.
5. Venkatesan, K. Nostalgic Memories of Gandhi Ashram. Rajaji - 93 Souvenir, 1971, P.236.
6. वा.भा. पाटील, 'प्राचीन व आधुनिक भारतीय विचारवंत' प्रशांत पब्लिकेशन, जळगाव पहिली आवृत्ती २००९, पृ.क्र.५६
7. खान इक्बाल, 'पंचायतीराज एवं ग्रामीण विकास योजना' रितू पब्लिकेशन, जयपूर, प्रथम संस्करण २००४, पृ.क्र.२५
8. भारदे बाळासाहेब, 'गांधी विचारदर्शन-ग्रामस्वराज', पृथ्वीराज प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती १९९५, पृ.क्र. १५